# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १७/०४/२०२४ (बुधवार) सायंकाळ**

---

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद**

**वाहनासह एकुण १५,२१,०००/— रूपयाचा मुद्‌देमाल जप्त**

दिनांक १७/०४/२०२४ रोजी चे १२.३५ वा. ते १३.१५ वा. दरम्यान पोस्टे रामटेक येथील स्टाफ पोस्टे रामटेक हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, नगरधन गावात अवैधरित्या रेतीची वाहतुक होत आहे. अशा माहीतीवरून स्टाफ यांनी नाकाबंदी केली असता कोठेश्वर मंदीराकडे एक पिवळया रंगाचे टिप्पर येतांनी दिसल्याने टिप्पर क्र. एम.एच.—४०/बी.जी.—४९१९ ला थांबवुन पाहणी केली असता वाहनामध्ये चालक **आरोपी नामे— मुकेश हरिचंद्र तुमसरे रा. सालई, मोहाडी जि. भंडारा** हा त्याचे ताब्यातील वाहनामध्ये ७ ब्रास रेती प्रती ब्रास ३०००/—रू. ची वाहतूक करतांना मिळून आल्याने सदर टिप्पर चालकास टिप्पर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून १) १० चक्का टिप्पर क्र एम.एच.—४०/बी.जी.—४९१९ किंमती १५,००,०००/— रू मध्ये अंदाजे ७ ब्रास रेती प्रती ब्रास ३०००/—रू प्रमाणे २१,०००/—रू असा एकुण १५,२१,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे— १) मुकेश हरिचंद्र तुमसरे रा. सालई, मोहाडी जि. भंडारा २) रूपेश देशमुख रा. खापा ता. तुमसर जि. भंडारा (टिप्पर मालक)** यांचेविरुद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक प्रशांत काळे, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत लांजेवार, पोहवा अमोल इंगोले, पोना मंगेश सोनटक्के, प्रफुल रंधई, पोशि धिरज खंते, शरद गिते यांनी केली.

## पोस्टे उमरेड हद्दीतील मौजा गरडेपार पारधी बेडा येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

आगामी लोकसभा निवडणुक २०२४ या अनुषंगाने कोणतेही अनुचित प्रकार घडु नये या करीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. १७/०४/२०२४ रोजी मौजा गरडेपार पारधी बेडा येथे मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे एकुण ०२ महिला व ०२ पुरूष आरोपी नामे– **१) सीयम बनलाल पवार, वय ३२ वर्ष, रा. गरडेपार पारधी बेडा २) सुभाष रामप्रसाद पवार, वय ५५ वर्ष, रा. गरडेपार पारधी बेडा** हे मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आले. आरोपीचे ताब्यातून १) २८० लिटर मोहाफूल गावठी दारू ५० रू लिटर प्रमाणे किंमती १४०००/–रू. २) २४०० लिटर मोहाफूल सळवा रसायन कि. ३० रु लिटर प्रमाणे ७२०००/–रू. ३) प्लास्टिक ड्रम व इतर साहित्य किंमती १००००/–रू. असा एकुण किंमती ९६०००/– रू चा मुदेमाल मिळून आल्याने नष्ट करण्यात आला. ०२ महिला आरोपी व ०२ पुरूष यांचेविरुद्ध पो. स्टे उमरेड येथे कलम ६५ (एफ), (सी), (ई), (ब) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनी किशोर शेरकी, पोउपनि आशिष मोरखडे, सफौ नाना राउत, पोहवा संजय बांते, दिनेश अधापुरे, रोशन काळे, पोहवा अरविंद भगत, गजेंद्र चौधरी, विनोद काळे, मिलींद नांदुरकर, इक्बाल शेख, नितेश पिपरोदे, शंकर मडावी, विरेंद्र नरड, अमृत किनगे, रोहन डाखोरे, चालक मोनु शुक्ला, अमोल कुथे, मपोहवा नम्रता बघेल, कविता बचले, वनिता शेंडे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर